क्र.निशि/दुकान/१०/२०१७/प्र.क्र.६२/जा. ५१

नियत्रंक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा, मुंबई यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
ज.टा.मार्ग, १४, चर्चगेट, मुंबई-२०.
दुरध्वनी क्र -०२२ २२८५२८१४
ईमेल - dycor.ho-mum@gov.in
दिनांक :- ०७/०२/२०१८

प्रति,
माहिती संचालक,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन, नविन प्रशासकीय भवन,
१७ वा मजला, मंत्रालयासमोर
मंबई -४०००३२

**विषय- मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रात नविन शिधावाटप दुकान उघडण्यासाठी जाहिरात प्रसिध्द करणे बाबत.**

**संदर्भ- क्र.निशि/दुकान/१०/२०१७/प्र.क्र ६२/जा.१ ,दि.०२.०१.२०१८.**

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधिन पत्रासोबत मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रात नविन अधिकृत शिधावाटप दुकान उघडण्यासाठी प्रसिध्द करण्यासाठी पाठविण्यात आलेली जाहिरात दिनांक ०६.०१.२०१८ रोजी दैनिक हमारा महानगर (हिन्दी) व दिनांक ०७.०१.२०१८ रोजी दैनिक सामना (मराठी) या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेली आहे.

सदर जाहिरातीच्या अनुषंगाने अर्ज विक्री व स्विकृतीची मुदत वाढविण्यात येत असून त्याबाबतची नोटीस सोबत पाठविण्यात येत आहे. सदरहू नोटीस जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेल्या उपरोक्त वृत्तपत्रात तात्काळ प्रसिध्द करण्यात यावी व जाहिरातीच्या नमून्यासहीत देयके या कार्यालयाकडे पाठवावीत.

सोबत- नोटीस

(दिलीप शिंदे, भा.प्र.से.)
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा, मुंबई

## मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रात नविन अधिकृत शिधावाटप दुकान(रेशन शॉप) उघडण्यासाठी जाहिरात

या कार्यालयामार्फत मुंबई ठाणे शिधावाटप क्षेत्रात संस्था/स्वयंसहाय्यता बचत गटासाठी ४२४ ठिकाणी अधिकृत शिधावाटप दुकाने मंजूरीसाठी दैनिक हमारा महानगर (हिन्दी) व दैनिक सामना (मराठी) या वृत्तपत्रात अनुक्रमे दिनांक ०६.०१.२०१८ व दिनांक ०७.०१.२०१८ रोजी या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने अर्ज विक्री व स्विकृतीच्या मुदतीत दिनांक २८.०२.२०१८ पर्यंत वाढ करण्यात येत आहे. सबब इच्छुक आवेदकांनी विहीत नमुन्यातील अर्ज संबधित परिमंडळ कार्यालयाकडून प्राप्त करुन आवश्यक त्या कागदपत्रासह परिमंडळ कार्यालयात उपरोक्त मुदतीत सादर करावीत.

इच्छुक संस्था/स्वयंसहाय्यता गट यांनी अधिक माहितीसाठी संबधित कार्यालयाशी संपर्क साधावा. सदर जाहिरातीस दिलेली मुदतवाढ www.controllerofrationing-mumbai.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

(दिलीप शिंदे, भा.प्र.से.)
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा, मुंबई